दावा अर्ज क्र. ८४/२०१९

**मा. उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा) कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स् सहकारी असोसिएशन मर्या., कोल्हापूर यांचे समोर...**

| | |
|---|---|
| श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर<br>ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | अर्जदार |
| विरुध्द<br>श्री रंगराव ज्ञानदा रवोडे<br>रा. निठवे ता. करवीर वगैरे | वि. प. |

यातील अर्जदार तर्फे दाव्याचे कामी पुरसीस,

सदरचे कामी अर्जदार बँकेने वि.प. विरुध्द रक्कम वसुली कामी दावा दाखल केला आहे. यातील वि.प.नं. ५ हे मयत असलेचे समजून आले आहे. मयताच्या वारसा विरुध्द स.का.क. १०१ चे कामी वारस दाखल करणेबाबत स्पष्ट तरतूद नाही. त्यामुळे सदरचे कर्ज सहकार कायदा कलम ९१ नुसार वसुल होऊन मिळणेबाबत सहकार कोर्टात दावा दाखल करीत आहे. त्याकारणे अर्जदार बँक हे काम बँकेच्या कोणत्याही हक्कास बाधा न येता काढून घेत आहे.

म्हणून दिली पुरसिस.

मे. जा. व्हावे,

कोल्हापूर.

दि.२९/४/२०१९

(बँक प्रतिनिधी)

श्री वारणा सह. बँक लि., वारणानगर .
प्रधान कार्यालय : वारणानगर, जि. कोल्हापूर. ४१६ ११३
फोन :- (०२३२८) २२४२८६/८७,
फॅक्स :- (०२३२८) २२४१९२

SHREE WARANA SAHAKARI BANK LTD; WARANANAGAR
HEAD OFFICE : Warananagar, Tal. Panhala, Dist: Kolhapur 416 113
Ph - (02328) 224286/87 Fax : (02328) 224192
www.waranabank.com Email : info@waranabank.com

जावक नं / Ref. No. : दिनांक / Date :

***संचालक मंडळ सभा दिनांक : २८/०३/२०१९ मधील ठराव क्रमांक : १७ ची नक्कल.***

*ठराव क्रमांक :१७*

*विषय : मे.उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा) कोल्हापूर जिल्हा नागरी बॅंक्स् सह.असो.मर्या. कोल्हापूर यांचेकडील दावा अर्ज क्रं.१०१/४३/१८-१९ व १०१/८४/१८-१९ काढुन घेणे बाबत...*

*महोदय,*

मे.उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा) कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स् सहकारी असो.मर्यादित कोल्हापूर यांचेकडे श्री. शिवाजी पांडुरंग किबीले यांचा दावा क्रं.१०१/४३/१८-१९ व श्री. रंगराव आनंदा खोंद्रे यांचा दावा क्रं.१०१/८४/१८-१९ वसुलीसाठी अनुक्रमे दिनांक १८/०२/२०१९ रोजी दाखल केले होते परंतु सदर दाव्यातील अनुक्रमे जामिनदार कै.सर्जेराव बाबुराव किबीले व कै. शहाजी दामोदर शिरोळकर हे मयत असलेचे समजुन आले आहे. मयताच्या वारसाविरूध्द सहकार कायदा कलम १०१ चे कामी वारस दाखल करणेबाबत स्पष्ट तरतुद नाही. त्यामुळे सदरची कर्जे सहकार कायदा कलम ९१ नुसार वसुल होऊन मिळणेबाबत सहाकार कोर्टात दावे दाखल करणे आवश्यक आहे. म्हणून वरील नंबरचे दावे मे.उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा) कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स् सहकारी असो. मर्यादित कोल्हापूर यांचेकडून काढून घेणे व सहकार कोर्टात दावा दाखल करणेसाठी ऑफिसने तयार केलेली शिफारस वाचून दाखविणेत आली.

सदरबाबत सविस्तर विचार होवून ठराव करणेत येतो की, **" बँकेच्या कर्जदारांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड ठरवून दिलेल्या हप्त्याप्रमाणे न केलेमुळे सदरची खाती थकबाकीत तसेच एन.पी.ए मध्ये गेलेली आहेत. कर्जदार व त्यांचे जामिनदाराकडे बऱ्याच वेळा लेखी व तोंडी तगादा करूनही तसेच लवादपूर्व नोटीस पाठवून देखली वसुली होत नसलेमुळे कर्जदार व जामिनदार यांचेवर महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे कलम १०१ अन्वये मा. उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा) यांचेकडे वसुली करिता अर्ज केला होता. सदर दाव्यातील जामिनदार मयत झालेने सदरचे दावे ९१ अंतर्गत वर्ग करणेस मंजूरी देणेत येत आहे."**

सूचक : मा.बळवंत शंकर पाटील
अनुमोदक : मा. प्रशांत मधुकर जमने

(खरी नक्कल) ठराव सर्वानुमते मंजूर

श्री वारणा सहकारी बँक लि. वारणानगर

जनरल मॅनेजर